ला.प्र.वि, हिंगोली
दिनांक :– ११.०७.२०२५

# प्रेस नोट

**आरोपी लोकसेवक प्रकाश चक्रधर निरगुडे, कार्यकारी मंडळ सदस्य, जिजामाता शिक्षण संस्था, शास्त्रीनगर, ता.जि. हिंगोली तथा माजी प्राचार्य, सुखदेवानंद कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय,भांडेगाव ता. जि. हिंगोली यांनी तक्रारदार यांचे मुलीचे प्रवेशासाठी शासकीय फिस ६६८/–रुपये असतांना, २,०००/–रुपये पंच साक्षीदार यांचे समक्ष मागणी करून, १३३२/–रुपयाची अतिरिक्त पैश्याची/लाचेची मागणी करुन ती स्विकारण्यास सहमती दर्शविल्यावरून त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोंली ग्रामीण जि.हिंगोली येथे गुरनं ४००/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि.०२.०७.२०२५ रोजी तक्रार दिली की, आरोपी लोकसेवक प्रकाश चक्रधर निरगुडे, माजी प्राचार्य, सुखदेवानंद कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय,भांडेगाव ता.जि.हिंगोली तथा कार्यकारी मंडळ सदस्य,जिजामाता शिक्षण संस्था, शास्त्रीनगर, ता.जि. हिंगोली रा. पठाडे कॉलेजच्या पाठीमागे रामाकृष्णा नगर अकोला बायपास ता.जि.हिंगोली हे तक्रारदार त्यांच्या मुलीने १० वी बोर्डाची परिक्षा फेबुवारी २०२५ मध्ये दिली असुन ती इयत्ता १० वी. पास आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या मुलीने प्रवेशासाठी ऑनलाईन फॉर्म भरला आहे. तक्रारदार यांचे मुलीला सुखदेवानंद कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, भांडेगाव ता.जि.हिंगोली येथे प्रवेश मिळणार असा मेसेज त्यांचे मोबाईल आला होता. त्यामुळे दिनांक ०१.०७.२०२५ रोजी तक्रारदार यांना सुखदेवानंद कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, भांडेगाव ता.जि.हिंगोली येथे प्रवेशसाठी बोलावले. तक्रारदार तेथे गेले असता आरोपी लोकसेवक प्रकाश चक्रधर निरगुडे, माजी प्राचार्य, सुखदेवानंद कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, भांडेगाव ता.जि.हिंगोली तथा कार्यकारी मंडळ सदस्य, जिजामाता शिक्षण संस्था, शास्त्रीनगर, ता.जि. हिंगोली यांची भेट झाली. भेटी दरम्यान आरोपी लोकसेवक प्रकाश चक्रधर निरगुडे यांनी तक्रारदार यांचे मुलीचे इयत्ता ११ वीचे प्रवेश सुखदेवानंद कला व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, भांडेगाव येथे प्रवेशासाठी फॉर्मवर फिस ६६८ रु. असतांना ३,०००/–रुपये दयावे लागतील तरच तिचा प्रवेश आमचे कॉलेजवर करू, तुम्ही ३,०००/–रुपये दिले नाही. तर तुमच्या मुलीचा प्रवेश आम्ही करणार नाही. असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे ३,०००/–रुपयेची लाचेची मागणी केलेबाबत तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०२.०७.२०२५ रोजी तक्रारदार यांची तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता तक्रारदार यांचे मुलीला इयत्ता ११ वी विज्ञान शाखेमध्ये प्रवेश घेण्यासाठी शासकीय नियमानुसार ६६८/–रुपये प्रवेश फि असतांना आलोसे प्रकाश निरगुडे यांनी अयोग्यरित्या व अप्रमाणिकपणे आपले कर्तव्य करुन तक्रारदार यांचेकडे २,०००/–रुपये पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेची मागणी केली. शासकीय फि ६६८/–रुपये असतांना १३३२/–रुपयाची अतिरिक्त पैश्याची/लाचेची मागणी करुन ती स्विकारण्यास सहमती दर्शविल्यावरून आलोसे प्रकाश निरगुडे यांचे विरूध्द पोलीस स्टेशन हिंगोंली ग्रामीण जि.हिंगोली येथे गुरनं ४००/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी श्री संदीप पालवे पोलीस अधीक्षक, डॉ.श्री संजय तुंगार अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, श्री विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली, श्री राजेश मलपिलु, पोलीस निरीक्षक यांनी सपोउपनि महंमद युनूस, विजय शुक्ला, पोहेकॉ रविंद्र वरणे, गजानन पवार, भगवान मंडलीक, पोह गोविंद शिंदे, पोह राजाराम फुपाटे, पोशि/शिवाजी वाघ, अमोल जाधव, विनोद पुंडगे, मपोह योगीता अवचार, चापोह श्री शेख मन्नान अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**मा.संदीप पालवे पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.नं. ९५४५५३१२३४**
**श्री. विकास घनवट, पोलीस उप अधीक्षक, मो.नं.९८२२२५९९३२**
**टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५**

(राजेश मलपिलु)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,हिंगोली.